**<u>ठाणे महानगरपालिका,ठाणे.</u>**

महापालिका सचिव कार्यालय,
दिनांक : ०८/१२/२००९

**ठाणे महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेची सूचना**
**सभा सूचना क्रमांक ८, दिनांक ०८/१२/२००९**

**प्रति,**
**सन्मा. श्री / श्रीमती ----------------------------**
सदस्य/सदस्या,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

या सुचनेद्वारे आपणांस कळविण्यांत येते की, ठाणे महानगरपालिकेची **सर्वसाधारण सभा शुक्रवार दि.१८/१२/२००९ रोजी सकाळी ११.३० वाजता** ठाणे महानगरपालिकेच्या **"भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर सभागृहात"** सभा सूचना क्रमांक ८, दिनांक ०८/१२/२००९ रोजीच्या विषयपत्रिकेवर विचारविनिमय करण्यासाठी आयोजित करण्यात आली आहे.

तरी सदर सभेस आपण कृपया उपस्थित रहावे, ही विनंती.

**<u>मा.महापौर महोदय यांचे मंजुरीने .. .. ..</u>**

**( सौ.छाया मानकर )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

**<u>सभा सूचना क्रमांक ८, दिनांक ०८/१२/२००९ ची विषयपत्रिका</u>**
**<u>प्रश्नोत्तरे</u>**

| **प्रकरण क्रमांक** | **विषय** |
|---|---|
| **१५१.** | ठाणे महानगरपालिकेच्या दि. २०/११/२००९ ( तहकूब सभा ) रोजीच्या मा.सर्वसाधारण सभांचे इतिवृत्तांत वाचून कायम करणेबाबत. |
| **१५२.** | शाई धरण प्रकल्प, ता.शहापूर, जि.ठाणे<br>प्रकल्पास दिलेली प्रशासकीय मान्यता रद्द करणेबाबत मा.सर्वसाधारण सभेच्या धोरणात्मक निर्णयासाठी सादर. |
| **१५३.** | कळवा ग्रामपंचायत कार्यालय येथे बहुउद्देशिय इमारत बांधणेसाठी येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |
| **१५४.** | प्रभाग क्रमांक १०२ मध्ये दातिवली तलाव परिसरामध्ये संरक्षक भिंत व गेट बांधणेसाठी येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत. |

**१५५.** प्रभाग क्रमांक ५८ येथिल जुना बेलापूर रस्त्यालगत सर्व्हे क्रमांक १३२८ येथे कळवा प्रभाग समिती कार्यालयाकरीता नवीन इमारत बांधणेसाठी येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**१५६.** घोडबंदर रोड ते हिरानंदानी संकुल या D.P. रस्त्याचे नाला ते हिरानंदानी संकुल दरम्यान उजव्या बाजूचे रुंदीकरण व बांधकाम करणेच्या कामासाठी येणा-या खर्चास मा.सर्वसाधारण सभेची प्रशासकीय व वित्तीय मान्यता मिळणेबाबत.

**१५७.** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये
विकास योजनेतील अस्तित्वातील अथवा नियोजित रस्ते तसेच मनोरंजनाची मैदाने / खेळाची मैदाने / बगीचा / पार्कस् व मोकळया जमिनीखालील एक अथवा दोन स्तरावरील वाणिज्य वापरासह वाहनतळ व स्कायवॉकवर वाणिज्य प्रयोजन अनुज्ञेय करणेकरीताची तरतूद ठाणे शहराच्या मंजूर विकास नियमावलीत करणेबाबत.

**१५८.** जवाहरलाल नेहरु पुनरुत्थान अभियाना अंतर्गत परिवहन सेवेसंबंधी सुरधारणा कार्यक्रम राबविणेबाबत.

**१५९.** जकात अनुसूचीतील अनुक्रमांक १९ चे दरांमध्ये बदल करणेबाबत.

**१६०.** घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून सेवा आकार ( User Charges) आकारण्याबाबत.

**१६१.** आडवली-भुताली, जि.ठाणे येथील वनविभागाची जागा घनकचरा प्रक्रिया केंद्रासाठी / क्षेपणभूमीसाठी उपलब्ध करुन घेणेबाबत.

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक : ०८/१२/२००९

**( सौ.छाया मानकर )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

# ठाणे महानगरपालिका, ठाणे.

ठाणे महानगरपालिका सभा सूचना क्रमांक ८, दिनांक ०८/१२/२००९ अन्वये शुक्रवार दि.१८/१२/२००९ रोजीच्या मा.सर्वसाधारण सभेसाठी विचारलेल्या प्रश्नांची यादी खालीलप्रमाणे.

**प्रश्न क्रमांक १ :-** सन्मा.सदस्य श्री.जनार्दन कृष्णा खेतले यांनी दि.१०/११/२००९ रोजीच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात विचारलेले प्रश्न.

| | |
|---|---|
| १. | ठाणे महानगरपालिका हद्दीत कोणकोणत्या कंपन्यांचे किती व कोणकोणत्या ठिकाणी मोबाईल टॉवर आहेत ? त्यापैकी कोणकोणत्या कंपन्यांचे किती अधिकृत व अनधिकृत आहेत ? त्याची संपूर्ण माहिती मिळावी. |
| २. | सन २००९-२०१० या आर्थिक वर्षात ठाणे शहरातील खड्डे व चर भरण्याची किती किंमतीची कामे केली गेली ? त्यापैकी किती कामांची निविदा काढण्यात आली होती ? त्याची संपूर्ण माहिती मिळावी. (सदरची माहिती प्रत्येक प्रभाग समिती प्रमाणे मिळावी.) |
| ३. | संपूर्ण ठाणे शहरामध्ये कोणकोणत्या संस्थांमार्फत किती दराने किती पाणी घेतले जाते ? शहराच्या लोकसंख्येनुसार किती पाण्याची आवश्यकता आहे ? संपूर्ण पाणी खात्यावरती किती खर्च होतो ? व किती उत्पन्न मिळते ? याची संपूर्ण माहिती मिळावी. |
| ४. | ठाणे महानगरपालिका हद्दीत किती ठिकाणी गणेश विसर्जन केले जाते ? सन २००९ मध्ये झालेल्या गणेश विसर्जनासाठी कोणकोणत्या घाटावरती किती खर्च करण्यात आला ? त्या कामांची निविदा काढण्यास आली होती की, कसे ? याबाबत संपूर्ण माहिती मिळावी. (प्रत्येक घराची वेगवेगळी माहिती मिळावी.) |
| ५. | ठाणे महानगरपालिकेच्या किती शिक्षण शाळा चालविल्या जातात ? शाळांच्या इमारती किती आहेत ? इमारतीमध्ये किती हॉल आहेत ? हॉलवर्ग भाडयाने देवून गेल्या दोन वर्षात किती भाडे मिळाले ? खोल्या वर्ग व हॉल भाडयाने देण्याबाबत मा.महासभेचा काय ठराव आहे ? |

**प्रश्न क्रमांक २ :-** सन्मा.सदस्य श्री.प्रकाश हरिश्चंद्र राऊत यांनी दि.२३/११/२००९ रोजीच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात विचारलेले प्रश्न.

| | |
|---|---|
| १. | ॲड.सूर्यकांत वढावकर रस्त्याच्या सुरुवातीस ठाणे पूर्व-पश्चिम रेल्वे पादचारी पूल रस्त्यास बाधित असल्याने सदर पूलाचा जिना रस्ता रुंदीसाठी केव्हा करण्यांत येणार आहे किंवा कसे ? |
| २. | ॲड.सूर्यकांत वढावकर मार्गाच्या उजव्या बाजूने म्हणजेच शिवम् हॉटेलच्या (ज्योत्सना अपार्टमेंट) पुढील भागापासून बँक ऑफ महाराष्ट्रापर्यंतचा शहर विकास आराखडयातील नियोजित रस्ता संपादन करणेबाबत कोणती कार्यवाही करण्यांत आली किंवा कसे ? |
| ३. | धर्मवीर आनंद दिघे चौकापासून स्व.रामभाऊ म्हाळगी मार्गावरील कुंभारवाडा मार्ग व दत्त मंदिर मार्ग जेथे मिळतो (कोळी स्मशानभूमीपर्यंत) तेथपर्यंतचा मार्ग दुतर्फा रस्ता रुंदी करणेबाबत कोणती कार्यवाही करण्यांत आली किंवा कसे ? |
| ४. | धर्मवीर आनंद दिघे चौक हा ठाणे पूर्व विभागातील रेल्वे स्टेशनजवळील फार महत्वाचा असा चौक असून तो अष्टविनायक चौकाप्रमाणे केव्हा रुंद करण्यांत येणार आहे किंसा कसे ? |
| ५. | सन २००० साली लोकमान्य टिळक पथावरील रस्ता रुंदीकरणात शिल्लक राहिलेला मंगला हिंदी हायस्कूल कंपाऊंडमधील शहर विकास आराखडयातील रस्त्याची जागा संपादन करण्याची कोणती कार्यवाही गेल्या ९ ते १० वर्षांत करण्यात आली किंवा कसे ? |

**प्रश्न क्रमांक ३ :-** सन्मा.सदस्य श्री.संजय प्रभाकर सोनार यांनी दि.०१/१२/२००९ रोजीच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात विचारलेले प्रश्न.

| | |
|---|---|
| १. | महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळाच्या ठाणे रेल्वे स्टेशन जवळील एस.टी. स्थानकामध्ये असणा-या उपहारगृह, रसवंतीगृह, वृत्तपत्र स्टॉल यांची मंजूर आराखडयाप्रमाणे बांधकामे झालेली आहेत का ? एस.टी. स्थानकामधील उपहारगृहाचे बांधकाम स्कायवॉक जवळ आल्याने ठाणेकर नागरिकांना होणा-या गैरसोयीची बाब लक्षात घेवून सहाय्यक आयुक्त, नौपाडा प्रभाग समिती यांना पत्र दिले असता, त्यासंदर्भात त्यांनी कोणती कारवाई केली आहे ? |
| २. | उपहारगृहाचे अनधिकृत बांधकामावर सहाय्यक आयुक्त कारवाई केव्हा करणार आहेत ? |

**प्रश्न क्रमांक ४ :-** सन्मा.विरोधी पक्षनेते श्री.हणमंत ज्ञानू जगदाळे यांनी दि.०७/१२/२००९ रोजीच्या पत्रान्वये लेखी स्वरुपात विचारलेले प्रश्न.

| | |
|---|---|
| १. | सन २००५ पासून ठाणे महानगरपालिका हद्दीमधील किती औद्योगिक भूखंड निवासी वापरासाठी करण्यात आले आहेत व ते कधी ? सदरचे भूखंड कोणत्या भागातील आहेत ? या भूखंडाची सविस्तर माहिती व जागा मालक डेव्हलपर्सची संपूर्ण माहिती देण्यांत यावी. |
| २. | औद्योगिक वापरासाठी असलेल्या भूखंडाला निवासी वापर करण्याची परवानगी देणे केव्हापासून बंद करण्यांत आलेले आहे ? व ते पुन्हा नव्याने चालू करण्यांत आलेले आहे किंवा कसे ? |
| ३. | सन २००५ ते २००९ पर्यंत किती ॲमिनिटी प्लॉट ताब्यात घेण्यात आले व कोणते ? त्याबद्दल सविस्तर माहिती उपलब्ध करुन देण्यांत यावी. |
| ४. | किती ॲमिनिटी प्लॉट ताब्यात घेण्यात आले नाहीत ? त्याची कारणे व ते भूखंड कोणते ? |
| ५. | किती शैक्षणिक भूखंड ताब्यात घेण्यांत आले ते कोणते ? व कि भूखंड ताब्यात घेण्यांत आले नाहीत व ते कोणते ? व त्याची कारणमिमांसा. |

महापालिका सचिव कार्यालय,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक : ०८/१२/२००९

**( सौ.छाया मानकर )**
महापालिका सचिव,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

बृहन्मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन उपक्रमाची बस सेवा अंतर्गत ठाणे परिसरामध्ये नवीन बस मार्ग सुरु करण्यास परवानगी देणेबाबतच्या प्रस्तावावर विचारविनिमय करण्याबाबत. (मा.परिवहन समिती ठराव क्रमांक १६ दि.३०/०८/२००८ अन्वये पारित केलेला ठराव व मा.परिवहन समिती ठराव क्रमांक १०६, दि.०८/१०/२००८ अन्वये केलेली शिफारस